
# कथा महादेवाच्या

मानसी काणे



परी प्रकाशन





**कथा महादेवाच्या**

© सुरक्षित

**प्रकाशक :**
परी प्रकाशन
निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली,
कोल्हापूर - ४१६ ००१

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**मुखपृष्ठ :**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक :**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती :**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत :**
रुपये १००/-





# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | शिवाची उत्पत्ती आणि सृष्टीची निर्मिती | ५ |
| २. | भगवान शिव आणि सती | ८ |
| ३. | दक्षाचा यज्ञ आणि सतीची आत्माहुती | १३ |
| ४. | शिवांकडून दक्षास जीवदान | १९ |
| ५. | हिमालयकन्या पार्वतीचा जन्म | २१ |
| ६. | शंकर–पार्वती विवाह | २५ |
| ७. | तारकासुर वध | ३१ |
| ८. | पार्वतीनंदन गणेश | ३४ |
| ९. | शंखचूडाचा वध | ३७ |
| १०. | तुलसी आणि शाळिग्राम | ४२ |
| ११. | अंधकासुराची कथा | ४४ |
| १२. | गजासुरास मुक्ती | ४९ |
| १३. | विदल आणि उत्पल दैत्याचा नाश | ५१ |
| १४. | बाणासुराचे गर्वहरण | ५३ |
| १५. | नंदीश्वर अवतार कथा | ५६ |
| १६. | शिवांचा गृहपती अवतार | ५९ |
| १७. | द्विजेश्वर अवतार | ६२ |
| १८. | शंकरांचा 'हंस' अवतार | ६४ |
| १९. | शंकरांचा 'कृष्णदर्शन' अवतार | ६६ |
| २०. | शिवांचा 'अवधूतेश्वर' अवतार | ६८ |
| २१. | शिवांचा भिक्षुकावतार | ७० |
| २२. | शिवांचा सुरेश्वरावतार | ७३ |
| २३. | शिवांचा किरातावतार | ७५ |
| २४. | शिवांचा हनुमंतावतार | ८० |

२५. शिवरात्रीव्रताचा व्याधाला लाभ ........ ८२
२६. शिवांचे द्वादश ज्योतिर्लिंगावतार ........ ८६
१. सोरटी सोमनाथ ........ ८६
२. मल्लिकार्जुन ........ ८८
३. महांकालेश्वर ........ ८९
४. ओंकारेश्वर ........ ९२
५. केदारेश्वर ........ ९३
६. भीमाशंकर ........ ९४
७. काशी विश्वनाथ ........ ९६
८. त्र्यंबकेश्वर ........ ९७
९. परळी वैजनाथ ........ १००
१०. औंढ्या नागनाथ ........ १०१
११. रामेश्वर ........ १०२
१२. घृष्णेश्वर ........ १०४
२७. श्रीविष्णूंना सुदर्शन प्राप्ती ........ १०७
२८. नर्मदा महात्म्य ........ १०८
२९. यज्ञदत्त कुमाराला कुबेरपदाची प्राप्ती ........ १११
३०. माता भद्रकाली ........ ११४
३१. शुंभ–निशुंभाचा वध ........ ११७
३२. भस्म माहात्म्य ........ १२१
३३. वाल्मिकेश्वर ........ १२३
३४. सिमंतिनीची कथा ........ १२५
३५. भक्त श्रीयाळाची कथा ........ १२९
३६. त्रिपुरासुराचा वध ........ १३३




# शिवाची उत्पत्ती आणि सृष्टीची निर्मिती

त्याकाळी सर्व जगाचे चराचर स्वरूप नष्ट झाले होते. सूर्य, चंद्र, ग्रह, नक्षत्रे, दिवस, रात्र काही म्हणजे काही नव्हते. फक्त सुने आकाश मात्र होते. केवळ सत् तत्त्व आस्तित्वात होते. या निराकार तत्त्वाने आपल्या लीलाशक्तीने आकार धारण केला. सर्व शुभलक्षणांनी युक्त अशी मूर्ती निर्माण झाली. हेच सदाशिव ! या सदाशिवाने स्वत:च एक शक्ती निर्माण केली. अष्टभुजा, कमलनेत्री, आयुधांनी युक्त, अत्यंत तेजस्वी अशी ही शक्ती अंबिका, सर्वेश्वरी अशा नावाने ओळखली जाते.

तो सदाशिव परमपुरुष, शिव, महेश्वर आदि नावानी ओळखला जातो. त्यांनी त्यांच्या मस्तकावर गंगा, भालावर चंद्र धारण केला आहे. त्यांना पाच मुखे असून प्रत्येक मुखावर तीन नेत्र आहेत. दशभुजा असून त्रिशूळधारी आहेत. त्यांचे शरीर कर्पूरगौर असून त्यावर भस्म लावलेले असते. त्यांनी शिवलोक निर्माण केला. यालाच काशी किंवा आनंदवन असे म्हणतात.

या आनंदवनात विहार करीत असता शिवांच्या मनात दुसऱ्या पुरुष सृष्टीची निर्मिती करावी असे आले. शिवांनी आपल्या डाव्या अंगातून एक पुरुष प्रकट केला. तो अत्यंत सुंदर होता. त्याची कांती इंद्रनील मण्याप्रमाणे शामल होती. शरीर सुवर्णतेजाने चमकत होते. त्याने पितांबर परिधान केले होते. अजानुबाहू अशा त्या पुरुषाने शिवाला नमस्कार करून म्हटले, ''स्वामी, माझे नाव निश्चित करा आणि मला काम सांगा.''

शिव म्हणाले, ''वत्सा, तुझं नाव विष्णू. तुला आणखीही नावं मिळतील.'' असे म्हणून शिवाने श्वासमार्गाने विष्णूना वेदांचे ज्ञान प्रदान केले. विष्णूंनी शिवाची तपश्चर्या सुरू केली. तपाच्या प्रभावाने विष्णूच्या अंगातून नाना प्रकारच्या जलधारा निर्माण झाल्या. या जलाने सर्व



आकाश व्यापले. थकलेल्या विष्णूने त्या जलात शयन केले. येथे त्याना 'नारायण' असे नाव मिळाले.

त्यांच्यापासून तीन गुण, पंचमहाभूते, ज्ञानेंद्रिये, कर्मेंद्रिये आदि चोवीस तत्त्वांची निर्मिती झाली. जलात शयन केलेल्या विष्णूच्या नाभीतून शिवशंकरांच्या इच्छेने एक विशाल आकाराचे सूर्याप्रमाणे तेजस्वी असे पिवळ्या रंगाचे कमळ निर्माण झाले. मग शिवाने आपल्या उजव्या अंगातून ब्रह्मदेवाला निर्माण केले आणि त्या नाभिकमलात स्थापित केले. चार मुखे, भाळी त्रिपुंड्र, लाल कांती असे त्यांचे रूप होते. त्यांना आपल्या जन्माचे रहस्य समजेना. इतक्यात आकाशवाणी झाली की, 'तप कर'. मग ब्रह्मदेवांनी बारा वर्षे घोर तपस्या केली. त्यांच्यासमोर विष्णू प्रकट झाले.

याच वेळी दोघांच्या मध्ये एक महान ज्योतिर्लिंग उत्पन्न झाले. दोघांनीही लिंगाला मनोभावे प्रणाम केला. त्या ज्योतिर्मय लिंगाने आपल्याला प्रत्यक्ष दर्शन द्यावे म्हणून त्यांनी आणखी शंभर वर्षे तप केले. प्रथम त्यांना ''ओम, ओम'' असे शब्दरूप दर्शन झाले. ब्रह्मा आणि विष्णूंनी ओंकाराचा आदर केला. याचवेळी त्यांना पाच मुखे, दहा हात, कर्पूरगौर कांती, विविध आभूषणांनी युक्त अशा अद्भुत सुंदर मूर्तीच्या रूपात शिवाने दर्शन दिले.

भगवान शिवांचे हे रूप अत्यंत दिव्य होते. अकार मस्तक, आकार कपाळ, इकार उजवा व ईकार डावा नेत्र, उकार उजवा व ऊकार डावा कान, ऋकार उजवा गाल व ॠकार डावा गाल. लृ व लॄ या दोन नाकपुड्या, एकार वरचा ओठ व ऐकार खालचा ओठ,ओकार हे वरचे व औंकार हे खालचे दात तसेच अं व अ: हे दोन टाळू असे हे अक्षररूप शिव होते. विष्णू व ब्रह्मदेव यांनी नतमस्तक होऊन अक्षररूप शिवाचे दर्शन घातले आणि स्तवन केले. मग शिवाने त्यांना स्वत:च्या स्वरूपाचे विवेचन केले. त्यांनी सांगितले की माझ्या डाव्या अंगातून विष्णू, उजव्या अंगातून ब्रह्मा आणि हृदयातून रुद्र प्रकट झाले आहेत. ब्रह्मांना सृष्टीच्या निर्मितीचे आणि विष्णूंना रक्षणाचे काम सांगून आणि भोग, मोक्ष, दानाचा अधिकार देऊन शिव अंतर्धान पावले. मग त्यांच्या इच्छेप्रमाणे ब्रह्मदेवांनी देव, असुर, मानव अशी संपूर्ण सृष्टीची निर्मिती केली.

मरिची, अत्री, पुलह, पुलस्य, अंगिरा, ऋतू, वसिष्ठ, नारद, दक्ष व भृगू हे मानसपुत्र निर्माण झाले. संध्या नावाची सुंदरी निर्माण झाली. असाच एक सुंदर पुरुष ब्रह्मदेवांच्या मनापासून निर्माण झाला. त्याने ब्रह्मांच्या आज्ञेवरून फुलांच्या पाच बाणांनी स्त्रिया व पुरुषांना मोहित करण्यास सुरुवात केली. याचे नाव कामदेव असे ठेवले गेले. दक्षाच्या घामापासून उत्पन्न झालेली कन्या रतीचा कामदेवाशी विवाह झाला.

ब्रह्मदेवांची मानस पुत्री संध्याने तप करून ''ओम नम: शंकराय नम:'' असा जप केला. तिने यज्ञात शरीरत्याग केला. सूर्याने पितर आणि देव यांच्या तृप्तीसाठी तिच्या शरीराचे दोन भाग केले. शरीराचा वरचा भाग प्रात:संध्या आणि खालचा भाग सायंसंध्या बनला. प्रात:संध्या देवांना प्रसन्न करणारी झाली आणि सायंसंध्या पितरांना आनंद देणारी झाली. मुनींचा यज्ञ संपला तेव्हा यज्ञज्वालेतून सोन्याप्रमाणे तेजस्वी कन्या प्राप्त झाली. ती मुनीश्रेष्ठ मेधातिथीची पुत्री अरुंधती या नावाने विख्यात झाली. महर्षी वसिष्ठांशी तिचा विवाह झाला.

✦✦



# भगवान शिव आणि सती

एकदा ब्रह्मदेव दक्षाच्या घरी गेले. तेथे रती आणि कामदेव उपस्थित होते. ब्रह्मदेवांना वाटलं – 'महादेव कोणत्यातरी अनुपम सुंदरीशी विवाह करतील असं काहीतरी करावं.' भगवान शिवांना मोहित करण्याचं काम रती आणि कामदेवावर सोपविण्यात आलं. ब्रह्मांनी एक दीर्घ श्वास सोडला. त्यातून नयनरम्य वसंत निर्माण झाला. मलयानील आणि वसंत हे दोघे कामदेवाचे सहाय्यक झाले. ते शिवाकडे गेले; पण शिवावर त्याचा काहीच परिणाम झाला नाही. ते होते तसेच निर्विकार राहिले. सचिंत होऊन ब्रह्मदेवांनी श्रीविष्णूंचे स्मरण केले. ते प्रकट झाले. ब्रह्मांनी त्यांना विचारले, ''केशवा, शिव कोणत्या उपायाने पत्नीस स्वीकारतील ?''


यावर विष्णू म्हणाले, ''शिवच सर्वांचा कर्ता धर्ता आहे. तुम्ही त्यांनाच शरण जा. तुम्ही देवी शिवाचं ध्यान करावं. ती तुमचं मनोरथ पूर्ण करील. ती जर सगुण रूपात अवतीर्ण झाली तर ती महादेवांची पत्नी होईल. तुम्ही दक्षाला आज्ञा द्यावी. शिव आणि शिवा दोघेही भक्ताधीन आहेत. सध्या शिव कैलास पर्वतावर निवास करीत आहेत. शिवाही सती नावानं अवतीर्ण होणार आहे. तुम्ही त्या दृष्टीनं प्रयत्न करा.'' विष्णू अंतर्धान पावले.

ब्रह्मदेवांच्या आज्ञेने दक्षाने देवी जगदंबेस कन्येच्या रूपात प्राप्त करून घेण्यासाठी तप सुरू केले. त्याच्या तपश्चर्येवर प्रसन्न होऊन शिवा देवीने त्याला दर्शन दिले. तेजस्वी, सुंदर, आयुधांनी युक्त चतुर्भुज, मोकळा केशकलाप आणि तांबूस नेत्र अशी ती देवी पाहून दक्षाने आनंदाने तिला वंदन केले. तिची स्तुती केली. देवीनं त्याला वर मागण्यास सांगितलं. दक्ष म्हणाला,

''हे भक्तवरदायिनी, माझा स्वामी रुद्रनाम घेऊन भूतलावर अवतीर्ण झाला आहे; पण अजून आपला अवतार झाला नाही. मग त्यांची पत्नी कोण होणार ? आपण या भूतलावर अवतार घ्यावा आणि आपल्या रूपलावण्यानं महादेवास मोहित करावं. हे काम इतर कोणीही करू शकणार नाही. म्हणून हे देवी, आपण कन्यारूपानं माझ्या पोटी जन्म घ्यावा आणि हरमोहिनी होऊन महादेवांची पत्नी व्हावं असा मला वर द्यावा.''

''प्रजापते, मी तुझ्या तपामुळे प्रसन्न झाले. तुला पाहिजे ते देण्यासाठी मी उत्सुक आहे. मी तुझ्या पोटी जन्म घेईन. मी तपस्या करून महादेवांना प्राप्त करून घेईन; पण दक्षा, तू त्या शंभूचा आदर राखला पाहिजेस. जर कधी तुझा माझ्याविषयीचा आदर कमी झाला तर मी आपल्या शरीराचा त्याग करीन किंवा दुसरा देह धारण करीन. मी तुझी कन्या होऊन भगवान शिवांची पत्नी जरूर होईन.'' असे म्हणून देवी अंतर्धान पावली. देवीचा वर मिळाल्यावर दक्षाने नाना प्रकारची सृष्टी तयार करण्यास आरंभ केला; पण प्रजासृष्टीची वाढ होईना.

त्याने ब्रह्मदेवांना विचारलं, ''मी काय करू ?'' मग ब्रह्मदेवाच्या आज्ञेने दक्षाने वीरण प्रजापतीच्या कन्येशी वीरीणीशी विवाह करून दहा हजार पुत्र निर्माण केले. यानंतर दक्षाने मोठ्या प्रेमाने जगदंबेचे ध्यान केले. तिची मनोभावे प्रार्थना केली. आपला वर पूर्ण करण्याच्या



इच्छेने देवीनेही वीरीणीच्या पोटी जन्म घेण्याचे ठरविले. सुयोग्य वेळी दक्षपत्नीच्या उदरात देवी वाढू लागली. देवीच्या वास्तव्यामुळे वीरीणी महामंगलारूपीणी बनली. दक्षाने कुलास अनुसरून धर्मकृत्ये केली. दानधर्म केला.

वीरीणीच्या गर्भात देवीचा निवास आहे हे जाणून श्रीविष्णूंसह सर्व देवांनी देवी जगदंबेचे स्तवन केले. नऊ महिन्यांनंतर लौकिक विधींचा निर्वाह झाला. दहाव्या महिन्यात देवीने अनुकूल समय पाहून अवतार धारण केला. दक्ष आणि त्याच्या पत्नीस आनंद झाला. आकाशातून फुलांची वृष्टी झाली. वीरीणीच्या पोटी जन्म घेतलेल्या जगदंबेला दक्षाने नमस्कार केला. तिचे अलौकिक रूप पाहून सर्वांना आनंद झाला. या कन्येचे नाव 'उमा' असे ठेवण्यात आले. ती सती नावानेही प्रसिद्ध झाली.

दिसामासांनी कन्या वाढू लागली. बालपणापासून तिचे उत्तमोत्तम गुण दिसून येऊ लागले. दक्षकन्या आपल्या मैत्रीणींसमवेत वारंवार शिवाचे ध्यान करू लागली. तिला एकदा ब्रह्मदेवांनी सांगितले, ''सती, तू ज्यांची भक्ती करतेस त्या महादेवांना पती म्हणून प्राप्त करावेस. ते तुझ्याखेरीज पत्नी म्हणून इतर कोणाचीही निवड करणार नाहीत.'' ब्रह्मदेवांचं हे बोलणं ऐकून दक्षालाही आनंद झाला. उमा आता मोठी झाली. एक सुंदर तरुणी बनली. हिचा महादेवाशी विवाह कसा होणार याची चिंता दक्षाला लागली. सतीही महादेवाला प्राप्त करून घेण्यास उत्सुक बनली. शंकरांना प्राप्त करून घेण्यासाठी तपश्चर्या करावी म्हणून तिने आपल्या मातेची परवानगी मागितली. त्यानंतर आपल्या घरी तपश्चर्या सुरू केली.



सतीने एकाग्र चित्ताने शिवांचे ध्यान सुरू केले. ती सिद्धावस्थेस पोहोचली. ते पाहून श्रीविष्णू आणि सर्व देवांनी तिची प्रशंसा केली. देवांनी महादेवाची स्तुती केली. महादेवांनी त्यांना या स्तुतीचे कारण विचारले. ब्रह्मदेव म्हणाले,'' महादेवा ऐका. या सृष्टीचं कार्य नीट चालावं म्हणून विष्णू आणि मी सपत्नीक विश्वाचं कार्य करीत आहोत. आपणही देवांच्या हितासाठी एखाद्या परम सुंदर रमणीशी विवाह करावा.